Desktop /अस्थापना letter

**मा.आयुक्त यांचेकडे सादर
करावयाच्या नस्तीबाबत..**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८, लेखा विभाग
क्र.लेखा/१अ/कावि/३०९/२०१९
दिनांक :-१३/०३/२०१९

**परिपत्रक,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या भांडवली विभागातील विकास कामांच्या तसेच महसुली विभागातील पुरवठाधारकांच्या निविदा नस्त्यांवर लेखा/मुलेप/अंतर्गत लेखापरिक्षक विभागामार्फत अभिप्राय नोंदवून नस्ती व विषयपत्र मा.आयुक्त यांच्या मान्यतेकामी सादर केल्या जातात. व त्यास मा.स्थायी समितीने मान्यता दिल्यानंतर विभागांकडून कार्यारंभ आदेश दिला जाणे अपेक्षित आहे.

**तथापि निम्म स्वाक्षरीतांच्या असे निदर्शनास आले आहे की, मा.स्थायी समितीने मान्यता दिल्यानंतर कार्यारंभ आदेश देण्यासाठी तसेच देयके देण्यापुर्वी मान्यतेसाठीचे प्रस्ताव मा. आयुक्तांकडे सादर केले जातात. सदरची बाब योग्य नाही. वास्तविक मा.आयुक्त यांनी नस्तींवर नोंदविलेले अभिप्राय/सूचनांची विभागप्रमुखांनी पुर्तता करुन तद् नंतर विभागस्तरावर कार्यारंभ आदेश देणे आवश्यक आहे. केवळ ज्या नस्तींवर मा.आयुक्त यांनी विशिष्ट अशा सूचना नोंदविल्या असतील अशाच नस्त्या पुर्तता करुन मा.आयुक्तांकडे अवलोकनार्थ पाठविणे इष्ट आहे.**

सबब, कार्यारंभ आदेश व देयके अदा करण्याबाबतचे कोणतेही प्रस्ताव मा.आयुक्त यांचेकडे सादर करु नयेत. याबाबत सर्व विभागप्रमुखांनी दखल घेऊन त्याप्रमाणे अंमलबजावणी करावी.

**(श्रावण हर्डीकर)**
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८

प्रति,
सर्व संबधित विभागप्रमुख/शाखाप्रमुख